म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय का०वा०
दा. क्र. ७९६४६

IRBK-0116646
IRBK-0116646

# गोष्टींचा तास

## भाग ४ था

लेखक

भालचंद्र महादेव वैद्य

आवृत्ती ४ थी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १६६४६ नों दि १०.५.७६
वि. बा. वा.

IRBK-0116646

IRBK-0116646

किंमत रु. १·२०

प्रथमावृत्ती : १९४२
पुनर्मुद्रण : १९४४
पुनर्मुद्रण : १९४९
पुनर्मुद्रण : १९७२

मुद्रक – वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४
प्रकाशक – धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४

# मुलांनो

गोष्टी आवडत नाहीत कुणाला? लहानांपासून थोरांपर्यंत नि गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सगळ्यांनाच गोष्टी आवडतात. त्यांतल्या त्यात तुम्हाला गोष्टींची फारच आवड असते. कोणी गोष्टी सांगत असला की तुम्ही तेथे जमता. आम्हाला गोष्टी सांगा म्हणून गुरुजींच्या पाठीशी रोजच तुमचा ससेमिरा असतो.

ही तुमची गोष्टींची आवड लक्षात घेऊन या गोष्टी लिहिल्या आहेत.

बालमित्रांनो, या गोष्टींनी तुमचे मनरंजन होईल असा मला विश्वास वाटतो.

गोष्टींच्या तासाला या गोष्टी वाचल्यात तर दिवसभराच्या अभ्यासाचे श्रम नाहीसे होऊन नवीन काम करण्यास उत्साह वाटेल.

सदैव तुमचाच,

**भालचंद्र वैद्य**

☆

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | चांदोवाची मुलाखत ... ... | ५ |
| २ | चतुर जावई ... ... ... | ७ |
| ३ | गप्पीदासांचे संमेलन ... ... ... | ९ |
| ४ | दैव ... ... ... | १२ |
| ५ | आपण सारे भाऊ भाऊ ... ... | १५ |
| ६ | अडला नारायण गाढवाचे पाय धरी ... | १७ |
| ७ | शिष्याची परीक्षा ... ... ... | १९ |
| ८ | खरा भक्त कोण ? ... ... ... | २१ |
| ९ | अग अग म्हशी, मला कुठे नेशी ? ... | २४ |
| १० | लबाड साधू ... ... ... | २७ |
| ११ | शिकविलेली घोडी ... ... ... | २९ |
| १२ | चतुर खुशमस्कऱ्या ... ... ... | ३१ |
| १३ | चांगल्या मार्गाला लागला ... ... | ३४ |
| १४ | सांगकाम्या ... ... ... | ३६ |
| १५ | लंबकर्ण ... ... ... | ३८ |
| १६ | प्रधानाचे चातुर्य ... ... ... | ४२ |
| १७ | हे असे का ? ... ... ... | ४४ |
| १८ | देव बोलेनासा झाला ... ... ... | ४७ |


☆

१

# चांदोबाची मुलाखत

चंदू चौधरी मोठा चौकस मुलगा होता. कोणतीही नवीन गोष्ट पाहिली, की 'हे असे का? याचा उपयोग काय?' वगैरे नाना प्रकारचे प्रश्न विचारून तो आपल्या घरातील मंडळींना आणि गुरुजींना नकोसे करून सोडायचा.

त्या दिवशी पौर्णिमा होती. पांढरे शुभ्र चांदणे पडले होते. चंदूच्या घरची सगळी मंडळी जेवणे वगैरे आटोपून अंगणात गप्पा मारीत बसली होती. चंदू पण त्यांत होताच. चंदूची आई म्हणाली, 'किती सुरेख चांदणे पडले आहे आज!'

झाले. चंदूच्या प्रश्नांना सुरुवात झाली. तो आपल्या आईला म्हणाला, 'आई, हा चांदोबा राहातो तरी कुठे? एवढा प्रकाश देऊन संपत नाही? आपल्याला त्याच्याकडे जाता येईल?'


चंदूच्या कोणत्याच प्रश्नाचे उत्तर न देता त्याची आई म्हणाली, 'बाळ, ते तुला मोठा झालास म्हणजे कळेल.'

या उत्तराने चंदूचे समाधान झाले नाही. तो विचार करू लागला. त्याला वाटले, चांदोबाकडे आपल्याला जायला मिळाले तर किती बरे होईल! त्याला सगळी माहिती विचारता येईल. शिवाय त्याच्याजवळ प्रकाश असल्यामुळे काळोखाची तर भीतीच नाही.

विचार करताकरता चंदूला झोप लागली नि त्याला वाटले, आपण चांदोबाकडे चाललो आहोत. घूं ऽऽऽ असा मोठा आवाज होत असून आपण वर वर जात आहोत असे त्याला वाटले. त्याला फार मजा वाटत होती.

पण थोड्याच वेळात त्याचा आनंद मावळला. त्याला फार थंडी वाजू लागली. त्याला वाटले, उगाच आपण इकडे आलो. इतक्यात दुरू न

कोणी आपला हात पुढे करून म्हटले, ‘चंदू, थांब, तेथेच थांब. पुढे आलास तर तू अगदी गारठशील नि तुला हवा पण मिळणार नाही.’



चांदोबाच चंदूजवळ बोलू लागला. तो म्हणाला, ‘चंदू, तुला माझी मुलाखत हवी होती ना? पण बाबा रे, तुला मी खालून सुंदर नि हसरा दिसलो, तरी माझी खरी स्थिती फार चमत्कारिक आहे. आता मी अगदी गार, गार झालो आहे. माझा सगळा प्रकाश संपून मी काळा ठिक्कर पडलो आहे. आता मला सूर्याच्या उजेडावर अवलंबून राहावे लागते. येथे हवा तर मुळीच नाही. त्यामुळे झाडे नाहीत, पाणी नाही नि काहीच नाही. या स्थितीला मी अगदी कंटाळून गेलो आहे. अतिशय थंडीमुळे तर माझी अगदीच चमत्कारिक स्थिती झाली आहे. हवा, पाणी नि खाणे, पिणे यांशिवाय आता दिवस तरी कसे काढणार! हा ऽऽ हा ऽ हा ऽ, घ ऽ घ, का ऽऽ परे ऽ भर ऽऽ ले मला. जा ल ऽ व ऽ क र परत. नाऽही तर तुला थंडी बाधे ऽऽ ल.’

लगेच चंदूची थंडी कमी झाली. चंदू जागा झाला. पाहातो तो आई त्याला पांघरूण घालीत होती!

-

१. चंदूने आईला कोणते प्रश्न विचारले? आई काय म्हणाली?
२. वर वर जाऊ लागल्यावर चंदूला काय वाटते?
३. चांदोबा चंदूला काय म्हणाला? त्याला कोणत्या वस्तू मिळत नाहीत असे तो म्हणतो?

## २
## चतुर जावई

फार फार जुन्या काळातील गोष्ट. चीन देशात एक सरदार राहात असे. तो फार श्रीमंत होता. त्याची एकुलती एक मुलगी असून तिला तो जीव की प्राण करीत असे. मुलगीही मोठी गुणवान असून बापावर तिचे फार प्रेम होते. ती आपल्या वडिलांची आज्ञा न चुकता पाळीत असे.

मुलगी मोठी होताच तो गृहस्थ तिच्या लग्नाचा विचार करू लागला. अनेक श्रीमंत मुलांची स्थळे पाहून शेवटी त्याने त्यांपैकी एक मुलगा पसंत करून, आपला बेत मुलीला कळविला. परंतु यापूर्वीच त्या मुलीचे एका गरीब परंतु हुशार मुलावर प्रेम बसले असून त्याच्याशीच लग्न करावे असा तिने निश्चय केला होता; म्हणून तिला आपल्या वडिलांचे म्हणणे मान्य करता येईना.

मुलगी आपले ऐकत नाहीसे पाहून त्या गृहस्थाने तिला पुष्कळ धाक दाखवून पाहिले, परंतु ती आपल्या निश्चयापासून ढळली नाही. शेवटी बराच विचार करून त्याने काही अटी घालून लग्नाला परवानगी देण्याचे ठरविले. मुलीनेही ती गोष्ट कबूल केली; कारण आपण ज्याच्यावर प्रेम करतो, तो मुलगा फार हुशार आहे, तो कोणत्याही प्रकारच्या अडचणीतून युक्तीने आपली सुटका करील असा तिला आत्मविश्वास होता. त्या गृहस्थानेही असे ठरविले, की अशक्य गोष्टींच्या अटी घातल्या म्हणजे आपले काम सहजच होईल.

मग तो गृहस्थ आपल्या मुलीस म्हणाला, 'तू जर त्या मुलाकडून कागदातून थोडा विस्तव व वारा आणशील तर मी त्याच्याबरोबर लग्न करण्यास तुला परवानगी देईन.' ही वडिलांनी घातलेली अट ऐकून मुलीला जरा कसेसेच वाटले. पण कबूल केले असल्यामुळे तिला काही बोलता येईना. झालेली सगळी हकिकत मात्र तिने शक्यतितक्या

लवकर त्या तरुणाला कळविली. ती अट ऐकून तोही मोठ्या विचारात पडला. पण धीर धरून त्याने दोन महिने मुदत मागून घेण्याबद्दल त्या मुलीला सांगितले.

पुढे तो ही अट कशी पुरी करावी याचा रोज तासन्तास विचार करीत बसू लागला. मुदत संपत आली तरी त्याला अटी पुऱ्या करण्यासारखी काही युक्ती सुचेना. तो चिंतातुर झाला. एके दिवशी असाच विचार करीत असता त्याला एक युक्ती सुचली. लगेच त्याने आनंदाने टाळी वाजविली. त्या मुलीची व आपली भेट कधी होते असे त्यास झाले.

दुसऱ्या दिवशी त्या दोघांची भेट होताच तो तरुण आनंदाने म्हणाला, 'तुझ्या वडिलांच्या अटी आता खात्रीने पुऱ्या होणार.' हे त्याचे विश्वासाचे बोलणे ऐकून त्या मुलीला धीर आला.

दुसऱ्या दिवशी सर्वांसमक्ष अटी पुऱ्या करण्याचे ठरले. साक्षीदार म्हणून चार लोक जमले. त्यांच्या समक्ष ती मुलगी एक कागदाचा कंदील व एक कागदाचा पंखा घेऊन बापासमोर आली व म्हणाली, 'बाबा, तुमची पहिली अट कागदात विस्तव आणावयाची होती; हा घ्या कागदात विस्तव.' असे म्हणून तिने आत वात लावलेला कंदील बापापुढे ठेविला. नंतर पंख्याने वडिलांस वारा घालून तिने म्हटले, 'हा घ्या कागदातून आणलेला वारा!'

अटी पुऱ्या झालेल्या पाहून सरदार खूष झाला व त्याने मोठ्या थाटाने आपल्या मुलीचे लग्न तिने निवडलेल्या तरुणाबरोबर लावून दिले व त्या तरुणाला घरजावई केले.

१. मुलीचा स्वभाव कसा होता ?

२. लग्नासाठी तिच्या वडिलांनी कोणत्या अटी घातल्या ?

३. त्या अटी हुशार तरुणाने कशा पुऱ्या केल्या ?

२

## गप्पीदासांचे संमेलन

मुलांनो, मागे तुम्ही गप्पीदासाची एक गोष्ट वाचली आहे. अशा तऱ्हेचे पुष्कळ गप्पीदास एकदा एका गावी एकत्र जमले होते. त्यांचे संमेलनच त्या गावी भरले होते म्हणा ना! चारदोन नव्हे, पाचपन्नास गप्पीदास जमले होते.

जो तो आपल्या परीने लांबलांब गप्पा मारून इतरांना आश्चर्यचकित करून सोडण्याचा प्रयत्न करीत होता. त्यांच्या सभेत गप्पांना अगदी भर आला होता. त्यांच्या काही गप्पा ऐकून तुम्हांला हसू येईल म्हणून त्या मी तुम्हांला सांगणार आहे.

एक गप्पीदास म्हणाले, 'अहो काय सांगावे! आम्ही फिरत फिरत एका देशात गेलो; तेथे मोठी मजाच पाहायला मिळाली. तेथली माणसे उंचीने अगदीच कमी होती. मोठा उंच माणूस म्हणजे एक फूट उंच! काय त्यांची घरे नि काय त्यांचे कपडे; सगळेच विचित्र!'

यावर दुसरे गप्पीदास म्हणाले, 'मला अगदी बरोबर याच्या उलट स्थिती पाहायला मिळाली. काय ती ताडामाडाएवढी माणसे! त्यांतल्या एका माणसाने मुठीत धरून मला सहज वर उचलले; भीतीने माझी अगदी गाळण उडाली. कसाबसा त्या राक्षसांच्या हातून सुटलो म्हणून आज तुम्हांला येथे दिसत तरी आहे!'

तिसरे एक गप्पीदास याच्यावरही ताण करण्यासाठी उठले. ते म्हणाले, 'आम्ही ज्या देशात गेलो होतो तेथे काही विचित्र अनुभव आला आम्हांला. तेथे रात्रीच्या वेळी सूर्यप्रकाश असायचा नि भर दुपारी जिकडे तिकडे काळोख!! ते जाऊ द्या, पण मौज आहे ती पुढेच आहे.

अहो, एके दिवशी माझा एक मित्र नि मी रस्त्याने फिरत होतो. मध्यंतरी त्या मित्राला काही कामासाठी दुसऱ्या एका माणसाकडे



जायचे होते; तो मला आपल्याबरोबर बोलावीत होता, पण मी म्हटले, 'तुम्ही जाऊन या. मी येथे थांबतो.'

मित्र वर निघून गेला. मी तेथेच वाट पाहात उभा राहिलो. पाच, दहा, पंधरा मिनिटे झाली, तरी त्याचा पत्ता नाही. आता येईल, मग येईल, करताकरता दोन तास झाले. माझे पाय उभे राहून राहून दुखू लागले. इतक्यात मोठ्या जलदीने माझा मित्र परत आला.

मी म्हटले, 'काय बुवा इतका वेळ काय करीत होतास?' मित्र म्हणाला, 'नुसता गेलो नि आलो. भेट झाली नाही त्या माणसाची.'

नुसते जाऊन यायला दोन तास लागले! यावरून त्या माणसाचे ठिकाण किती उंच असेल याचा विचार तुम्हीच करा!!!'

यावर चौथे राव उठून म्हणाले, 'हे काही विशेष उंच वाटत नाही. माझ्या अनुभवाच्या मानाने हे काहीच नाही.

त्याचे असे झाले, एका मोठ्या शहरात मी राहात होतो. आम्ही राहात होतो ती इमारत अगदी रस्त्यालगतच होती. अगदी वरच्या मजल्यावर मी राहात असे. एके दिवशी संध्याकाळी काही कामासाठी मी गॅलरीत एक चूक ठोकीत असता हातोडी माझ्या हातून निसटली. हातोडीचे काय होते कोण जाणे म्हणून मी काळजीत पडलो.

दुसऱ्या दिवशी त्याच वेळी मी तेथून जाताना हातोडी नेमकी माझ्या पायांशी पडली!

किती उंच असेल ते ठिकाण याचा, लोक हो, तुम्हीच विचार करा!!'

१. पहिल्या गप्पीदासाने कोणती गोष्ट सांगितली?
२. तिसऱ्या गप्पीदासाने कोणती गोष्ट सांगितली?
३. अगदी वरच्या मजल्यावरून पडलेली हातोडी केव्हा मिळाली?

# ४
# दैव

शामभट जिवाला अगदी कंटाळून गेले होते. घरी दारी त्यांना आता कोठेच जगण्यात मौज वाटेनाशी झाली होती. काय करतील बिचारे! अगदी लहानपणापासून, फार काय, जन्मापासूनच दारिद्र्याने गांजले होते त्यांना. काही लोक गर्भश्रीमंत असतात, पण शामभट मात्र गर्भदरिद्री होते. सुख म्हणजे काय चीज असते हे त्यांना कल्पनेनेच जाणावे लागत होते.

त्यांना वाटे, आपले दैवच असे; त्याला इतर माणसे तरी काय करणार? कसे तरी दिवस काढायचे म्हणून ते मोठ्या कष्टाने दिवस कंठीत होते. त्यांचा बहुतेक वेळ आपल्या स्थितीचा विचार करण्यातच जात असे.

आपले दैवच असे आहे, मग कशाला उद्योग करा? कितीही उद्योग केला आणि खटपट केली तरी काही उपयोग होणार नाही, अशी त्यांनी आपली पक्की समजूत करून घेतली असल्यामुळे, त्यांचे कोणत्याही उद्योगाकडे लक्षच लागत नसे.

एके दिवशी ते आपले पुढे कसे होणार या चिंतेत आणि दुःखात अगदी चूर होऊन बसले असता त्यांची पत्नी तेथे येऊन म्हणाली, 'दिवसभर असे काळजी करीत बसण्याने तुमची प्रकृती अधिकच खंगणार नाही का? यापेक्षा काही तरी उद्योग केला, तर निदान त्यात मन रमेल आणि मनाला त्रास तरी होणार नाही.' पत्नीचे हे बोलणे ऐकून शामभट म्हणाले, 'आपले दैवच असे असल्याने कोठेच काही इलाज चालत नाही. मी पुष्कळ विचार केला, पण काही सुचत नाही. यापेक्षा एकदा मृत्यू येईल तर बरे! म्हणजे या सगळ्या यातनांतून तरी सुटका होईल.'

यावर भटजींची पत्नी जरा त्रासून म्हणाली, 'काही झाले नाही तरी चालेल, पण आपण असे बोलू नका. आपल्या आधारावरच मी आणि मुले नाही का?'

पत्नीचे हे बोलणे ऐकून शामभट स्वस्थ राहिले.

थोड्या वेळाने पत्नी म्हणाली, 'मला एक युक्ती सुचली आहे. मला वाटते, ही जागा आणि हा गावच आपल्याला कंटाळला आहे. येथून कोठे तरी दूर जाऊन स्थिती काही सुधारते का पाहू या.'

हे पत्नीचे बोलणे भटजींना खरोखरच आवडले. येथून कोठे तरी दूरच्या गावी गेल्यास कदाचित आपली स्थिती सुधारेल असे त्यांना वाटले. दुसऱ्या दिवशी तो गाव सोडून जाण्याचा भटजींनी निश्चय केला व तो अमलातही आणला.

सगळे सामानसुमान घेऊन दुसऱ्या दिवशी दुपारी सगळी जणे शेजारच्या गावी जाण्यास निघाली.

थोडे अंतर चालून गेल्यावर सामानाचे एक लहानसे गाठोडे मागे राहिले, म्हणून भटजी मोठ्या जलदीने मूळच्या जागी आले. दार उघडून आत जातात, तोच समोर एक भला मोठा दणकट आणि राकट माणूस आपल्या जोड्यांना तेल लावीत बसलेला त्यांना दिसला. प्रथम ते जरा घाबरलेच, पण धीर करून म्हणाले, 'तू कोण आहेस आणि येथे दार बंद असता आत कसा आलास?' त्यावर जरा हसून तो राकट माणूस म्हणाला, 'भटजी, मी येथलाच रहिवासी आहे. माझे नाव नशीब. मला नेहमी तुमच्याबरोबर राहावे लागते. आता तुम्ही दुसरीकडे चाललात, तेव्हा मलाही तुमच्याबरोबर तिकडे येणे भाग आहे; म्हणून जोड्यांना तेल लावीत होतो. तुम्ही जागेवर आणि गावावर रागावला, पण त्यात त्यांचा काही दोष नाही.'

हे आपल्या दैवाचे बोलणे ऐकून शामभट अगदी काकुळतीस येऊन म्हणतात, 'मग तू माझा पाठपुरावा तरी कोठपर्यंत करणार?'



यावर तो माणूस म्हणतो, 'भटजी, तुम्ही मनापासून उद्योग कराल तेव्हाच मी तुमची पाठ सोडीन. माझा खरा शत्रू उद्योग आहे. त्याला तुम्ही जवळ कराल तर तुमची माझ्या तावडीतून हां हां म्हणता सुटका होईल. जागा सोडून मात्र काही उपयोग नाही.'

इतके बोलून तो राकट माणूस एकाएकी दिसेनासा झाला. भटजी त्याच पावली परतले आणि सगळ्या मंडळींना घेऊन मूळच्या जागी परत आले.

त्या दिवसापासून भटजींनी सतत उद्योगास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत भटजींचा चांगला जम बसला. भटजी आता सगळ्यांना सांगत असतात, की 'उद्योगाचे घरी, ऋद्धिसिद्धि पाणी भरी' हे अगदी खरे आहे.

१. शामभट जिवाला का कंटाळले ? मग त्यांनी काय करायचे ठरविले ?
२. शामभटजींच्या पत्नीने काय सांगितले ?
३. भटजी का परत आले ? त्यांना कोण भेटले ? दैवाने भटजींना काय सांगितले ?
४. भटजींची स्थिती सुधारल्यावर ते लोकांना काय सांगू लागले ?

५

## आपण सारे भाऊभाऊ

एका शहरात एक श्रीमंत गृहस्थ राहात असे. तो बराच श्रीमंत असून मोठा दयाळू असल्याने त्याच्याकडे पुष्कळ याचक रोज यावयाचे. प्रत्येकाला काही ना काही दिल्याखेरीज तो राहात नसे.

एके दिवशी त्याच्याकडे एक भिकारी आला व आपणास काहीतरी देण्याबद्दल विनवू लागला. त्याची ती केविलवाणी स्थिती पाहून त्या गृहस्थाला दया आली व त्याच्यापुढे एक अधेली करीत त्याने म्हटले, 'ही अधेली घे व आजचा दिवस खुशाल भोजन कर.'

पुढे केलेली अधेली न स्वीकारता तो भिकारी त्या गृहस्थाकडे पाहात म्हणतो, 'महाराज, आपण परमेश्वर मानता काय?' यावर तो गृहस्थ म्हणाला, 'होय. माझा परमेश्वरावर पूर्ण विश्वास आहे. त्याच्या कृपेने हे वैभव मला मिळाले असून त्याचा योग्य प्रकारे उपयोग करावा म्हणून मी सदैव झटत असतो.'

हे त्या गृहस्थाचे उत्तर ऐकून भिकारी अधिक उत्साहाने म्हणतो, 'होय ना? मग आपण सर्व त्या परमेश्वराची लेकरेच नव्हे का?'

यावर त्या गृहस्थाने नुसती होकारार्थी मान डोलावली. मग तो भिकारी म्हणतो, 'का हो, असे जर आहे तर तुमचे माझे भावाचे नाते नाही का?' यावरही तो गृहस्थ अत्यंत शांतपणे म्हणाला, 'हो. तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.' तेव्हा भिकारी म्हणाला, 'तर मग आपणा दोघा भावांच्या स्थितीत एवढे जमीन अस्मानाचे अंतर असणे बरोबर नाही. आपण ती अधेली परत घ्या व भाऊ म्हणून संपत्तीचा योग्य तो वाटा मला देऊन टाका कसा!'

हे त्या भिकाऱ्याचे बोलणे ऐकून त्या गृहस्थाने भिकाऱ्याला देण्यासाठी पुढे केलेली अधेली परत ठेवून दिली व एक कवडी त्या



भिकाऱ्यापुढे करीत म्हटले, 'बाबा रे! ही एक कवडी घे. वास्तविक ही एक कवडीसुद्धा तुझ्या हिश्शापेक्षा जास्तच आहे, पण नाइलाज म्हणून ही तुला देत आहे.'

हे पाहून तो भिकारी जरा रागाने म्हणतो, 'काय हो! ही माझी चेष्टा की काय?' त्या गृहस्थाने उत्तर केले, 'छे! चेष्टा मुळीच नाही. अरे, जगात जेवढी माणसे आहेत तेवढी सारी एकाच परमेश्वराची लेकरे आहेत; अर्थात् ते सारे माझे भाऊ झाले. माझ्या संपत्तीचे तेवढे विभाग केल्यास मला वाटतं, तुला दिलेली कवडीही तुझ्या वाट्यास येणार नाही!'

१. श्रीमंत गृहस्थाची वागणूक कशी होती?
२. भिकाऱ्याने अधेली न घेता काय मागितले?
३. एक कवडी देखील वाटणीस येणार नाही असे श्रीमंत माणूस का म्हणाला?

## ६
## 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी'

फार प्राचीन काळची गोष्ट. एकदा सगळ्या देवांची मोठी सभा भरली होती. सभेत एकमेकांची स्तुती चालली होती. अग्नीने सूर्याची, तर सूर्याने इंद्राची, इंद्राने विष्णूची, तर विष्णूने इंद्राची अशी आळीपाळीने थोरवी सांगण्याची जणू चढाओढच लागली होती. त्या सभेत इतर सर्व देवतांप्रमाणे मेघांचा राजा जो वरुण तोही सभेस उपस्थित होता. पण वायू, अग्नी, सूर्य, चंद्र यांसारखे त्याचे कोणी स्वागतही केले नाही व त्याची स्तुतिही केली नाही.

आपल्याला येथे कोणीच विचारीत नाही, फार काय, आपल्या बाबतीत साधा शिष्टाचारही पाळला जात नाही, हे पाहून आधीच रागावलेल्या वरुणाच्या कानी उलट काही कुचेष्टेचे शब्द जाताच त्याचा राग अनावर झाला. साधा शिष्टाचारही न पाळल्याबद्दल त्याने सर्वांची निंदा केली व मग रागारागाने तो सभेतून निघून गेला.

सर्व देवांनी त्या वेळी हा सर्व प्रकार नुसता हसण्यावारी नेला.

त्या दिवसापासून वरुण गुप्त झाला. हळूहळू सर्वत्र पाण्याची हाकाटी सुरू झाली. पाऊस मुळीच पडेनासा झाला. पाण्याच्या अभावी लोकांना जीवन अशक्य झाले. जिकडेतिकडे मोठा हाहाःकार उडाला. वरुणाची प्रार्थना सुरू झाली. पण व्यर्थ. दिवसेदिवस पाणी आटत चालले. सगळ्या देवांनी सभा भरवून वरुणाची प्रार्थना केली. तरी वरुणाचा काही पत्ता नाही!

शेवटी सर्व देव विष्णूकडे जाऊन वरुणाची प्रार्थना करण्याबद्दल त्यांनी विष्णूस विनविले. देवांची केविलवाणी स्थिती पाहून विष्णूला दया आली. मग विष्णूने वरुणाच्या शोधास सुरुवात केली, पण काही पत्ता लागेना. शेवटी असे कळले, की एका गाढवाला वरुण कोठे आहे हे नक्की माहीत असून त्या प्रदेशाच्या आसपास ओलावा

असल्यामुळे तेथे उगवणाऱ्या चाऱ्यावर ते आनंदाने राहात आहे.



लागलीच विष्णूने आपला मोर्चा तिकडे वळविला. प्रथम त्या गाढवाने आपल्यास काही माहीत नसल्याचे सांगितले. परंतु नंतर श्रीविष्णूने त्याला नमस्कार करून त्याची थोडी स्तुती करताच गाढवाने विष्णूला वरुणाकडे नेले. तेथे विष्णूने वरुणाला अनेक समजुतीच्या गोष्टी सांगून त्याचे मन वळविले. मग सर्व देवांनी वरुणाची मनःपूर्वक क्षमा मागताच वरुण प्रसन्न झाला.

झाले! जिकडेतिकडे पाऊस पडू लागला. सगळ्यांना आनंदी-आनंद झाला. तेव्हापासून 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी' ही म्हण रूढ झाली.

१. वरुणाला का राग आला? त्याने काय केले?
२. वरुण नाहीसा झाल्यामुळे काय झाले?
३. देवांनी विष्णूला काय सांगितले?
४. गाढवाने जागा दाखवावी म्हणून विष्णूने काय केले?

## ७
## शिष्याची परीक्षा

एका गावात रामचंद्रपंत नावाचे एक गृहस्थ राहात असत. त्यांचा धंदा शिक्षकाचा असून ते आपल्या धंद्यात मोठे वाकबगार होते. पंचक्रोशीत त्यांची उत्तम शिक्षक म्हणून ख्याती असल्यामुळे त्यांच्याकडे बरीच मुले शिक्षणासाठी येत.

मुलांवर आपली नेहमी नजर राहावी म्हणून पंतांनी मुलांची आपल्या घराशेजारीच राहाण्याची सोय केली होती. त्यामुळे सर्व मुलांवर व्यवस्थित नजर राहून शिक्षणालाही जास्त वेळ मिळत असे.

पंतांकडील शिक्षणक्रम पुरा होताच पंत आपल्या विद्यार्थ्यांची निरनिराळ्या प्रकारे कसोटी पाहात व त्यांना आपापल्या घरी जाण्यास परवानगी देत. ही कसोटी पाहाण्यासाठी पंत दर वेळी निरनिराळ्या युक्त्या योजीत.

एकदा हरीभाऊ नावाचा एक विद्यार्थी अभ्यासक्रम पुरा होऊन परत घरी जावयाचा होता. हरीभाऊ पंतांचा आवडता विद्यार्थी होता. जाण्यापूर्वी त्याची थोडी परीक्षा पाहावी म्हणून पंतांनी त्याच्याजवळ एक लहानशी पेटी दिली व म्हटले, 'हरीभाऊ, आता चार दिवसांनी तू घरी जाणार आहेस, त्यापूर्वी दोन दिवस मी शेजारच्या गावी काही कामासाठी जाणार आहे. मी परत येईपर्यंत ही पेटी नीट जपून आपल्याजवळ ठेव. ही पेटीची किल्ली पण घेऊन ठेव. मात्र पेटी उघडून पाहू नकोस.'

त्या दिवशी संध्याकाळी पंतांनी गावी जाण्याचा बहाणा केला. इकडे हरीभाऊ मनात विचार करू लागला, की गुरुजींनी आपणास पेटी व किल्ली दिली, पण आत काय आहे ते मात्र सांगितले नाही व पेटी उघडू नको असे सांगितले. असे का बरे केले ? पेटीत काय आहे

हे पाहाण्यास काय हरकत आहे ? आपण आतील वस्तूला हात लावला नाही म्हणजे झाले. मग त्याने एकान्त जागी जाऊन पेटी उघडून पाहाण्याचे ठरविले. लागलीच तो एका अडगळीच्या खोलीत गेला व त्याने पेटी उघडली, तो काय चमत्कार! पेटीतून एक लहानसे उंदराचे पिलू टुणकन उडी मारून अडगळीत दिसेनासे झाले. पेटीत दुसरे काहीच नव्हते.



आता हरीभाऊ अगदी घाबरून गेला. गुरुजी आपणावर रागावतील म्हणून त्याला रडू कोसळले.

दुसऱ्या दिवशी गुरुजी येताच हरीभाऊने रडत रडत सगळी हकिकत त्यांस सांगितली. ती ऐकून पंत हसून म्हणाले, 'हरीभाऊ, तू खरे बोललास हे ठीक झाले; पण सांगितल्याप्रमाणे न वागल्याचा काय परिणाम झाला, पाहिलास ना? यापासून आता योग्य तो धडा घे.'

१. रामचंद्रपंतांकडे मुले शिक्षणासाठी का येत असत ?
२. हरीभाऊंची परीक्षा पाहाण्यासाठी पंतांनी काय केले ?
३. गुरुजी आल्यावर हरीभाऊने काय केले ?
४. शेवटी गुरुजी हरीभाऊला काय म्हणाले ?

~~वा. वा.~~

८

# खरा भक्त कोण ?

एकदा नारदांना वाटले, की ज्या अर्थी आपण नेहमी परमेश्वराचे नामचिंतन करीत असतो त्या अर्थी आपणच श्रेष्ठ भक्त आहोत.

या बाबतीत एकदा देवांना विचारून आपली खात्री करून घ्यावी म्हणून नारद 'नारायण नारायण!' करीत श्रीविष्णूकडे आले. इकडच्या तिकडच्या चार गोष्टी झाल्यावर देवांनी नारदांना येण्याचे कारण विचारले. त्यावर नारद म्हणाले, 'देवा, आज बरेच दिवस विचारीन विचारीन म्हणून एक प्रश्न योजून ठेवला आहे. आज मुद्दाम तो प्रश्नच तुम्हांला टाकून खात्री करून घ्यावी म्हणून आलो आहे.' यावर देव म्हणाले, 'नारदा, विचार की खुशाल तुझा प्रश्न. आजपर्यंत मी तुला कधी नाही म्हटले आहे का? काहीएक संकोच मनात बाळगू नकोस.'

देवांकडून इतके आश्वासन मिळताच धीर येऊन नारद म्हणाले, 'देवा, या जगात तुमचा खरा भक्त कोण याचे मला उत्तर पाहिजे आहे.'

देवांनी नारदांचा हेतू ओळखला. मग नारदांची थोडी गंमत करावी म्हणून देव म्हणाले, 'नारदा, प्रश्न एवढाच ना? याचे उत्तर मी तुला देईन, पण त्यापूर्वी तू माझे एक काम केले पाहिजे.'

नारदांनी काम करण्याचे मोठ्या आनंदाने कबूल केले.

इतके झाल्यावर देवांनी नारदाजवळ एक काठोकाठ तेलाने भरलेले भांडे देऊन म्हटले, 'नारदा, एवढे भांडे मृत्युलोकी मी सांगतो त्या ठिकाणी पोचवून ये. मात्र यातला एकही थेंब सांडू नको.'

देवांनी सांगितलेल्या ठिकाणी नारद जावयाला निघाले. तेलाचे भांडे काठोकाठ भरलेले असल्याने, तेल सांडू नये म्हणून नारदांचे सर्व लक्ष तिकडे लागले; त्यामुळे देवाचे नाव घेणे तसेच राहिले.



ज्याच्याकडे तेलाचे भांडे पोचवावयाचे होते तो एक शेतकरी होता. दिवसभर कष्ट करायचे, संध्याकाळी थोडा वेळ मुलांबाळांबरोबर खेळायचे व नंतर परमेश्वराचे चिंतन करून झोपी जायचे, असा त्याचा दिनक्रम असे. त्याच्याकडे नारद जेव्हा आले तेव्हा तो आपल्या मुलांबरोबर खेळत होता. त्याने नारदांचे स्वागत केले. नंतर सर्व विचारपूस झाल्यावर नारद परत जावयास निघाले.

परत देवांकडे आल्यावर नारदांनी घडलेली हकिकत सांगून आपल्या प्रश्नाचे उत्तर विचारले.

देव म्हणाले, 'नारदा, आता तू ज्याच्याकडे गेला होतास तोच माझा खरा भक्त आहे !' उत्तर ऐकताच नारदांना देवांचा राग आला. ते देवांना म्हणाले, 'ठीक आहे. तुम्हांला आमची काहीच किंमत नाही. जातो मी.'

यावर देव हसत म्हणाले, 'नारदा, रागावू नकोस. तू रोज माझे सारखे नामस्मरण करतोस, पण मृत्युलोकी जाताना तुला माझी आठवण तरी झाली का ?' नारद म्हणाले, 'त्या वेळी माझे लक्ष त्या भांड्याकडे होते.'

देव म्हणाले, 'तू नुसते भांडे नेतानाही मला विसरलास, पण तो शेतकरी एवढा संसाराचा जंजाळ पाठीशी असताना मला विसरत नाही; मग यात कोण श्रेष्ठ ते तूच ठरव.' हे ऐकून नारद उमजले.

१. विष्णूला नारदांनी कोणता प्रश्न केला ?
२. विष्णूने नारदाला कोणते काम सांगितले ?
३. शेतकरी श्रेष्ठ भक्त का ?
४. शेवटी नारद व विष्णूचे काय बोलणे झाले ?

९

# 'अग अग म्हशी मला कुठे नेशी'

चिंतूनानांचे लग्न झाल्याला आज जवळजवळ बारा वर्षे होऊन गेली, पण आजपर्यंत त्यांना लग्नामुळे केव्हाच सुख मिळाले नाही. कारण त्यांचे आपल्या बायकोबरोबर रोज काही ना काही कारणाने भांडण व्हायचे.

चिंतूनानांची बायको तर या परिस्थितीला अगदीच कंटाळलेली होती. नानांनी समाधानाने वागावे म्हणून ती फार झटत असे, पण त्याचा काहीच उपयोग होईना. दिवसेदिवस प्रकरण विकोपाला जाऊ लागले.

अलीकडे नानांची मातापितरे वारल्यापासून तर नानांना जणू ऊतच आला. बायकोने कोणतीही गोष्ट केली तरी ती त्यांना आवडेनाशी झाली. प्रत्येक गोष्टीत काहीतरी दोष काढून ते सारखे भांडण उकरून काढीत. नाना कितीही बोलले तरी त्यांची बायको त्यांना प्रत्युत्तर देत नसे. या तिच्या सहनशीलतेचा आणि मर्यादाशीलतेचा नानांवर उलट परिणाम होई व मग नाना अधिकाधिक जोराने भांडायला सुरवात करीत. नानांची बायको बिचारी सारे शांतपणे सहन करीत दिवस काढीत होती.

अलीकडे या घरगुती भांडणांना ऊतच आला होता. भांडणांत दुसरा पक्ष मुळीच लक्ष घालीत नसल्याने भांडणांचा काहीच निकाल लागत नव्हता. नाना रोज मोठ्या तावाने पत्नीला म्हणत, 'ते काही नाही, मला आता अगदी वीट आला आहे या परिस्थितीचा. मी आता घरदार सोडून जाणार आणि संन्यास घेणार.' हे नानांचे रोजचे शब्द ऐकून त्यांच्या पत्नीला फार वाईट वाटे, पण नानांच्या पुढे बोलावयाचे धाडस तिला होईना. तिला वाटे, न जाणो, स्वारी खरोखरच घरातून निघून जायची आणि भलतेच काहीतरी व्हायचे.

पण हे असे तरी किती दिवस चालणार ? घरात कोणालाच समाधान नसल्याने नानांची पत्नी त्या दुःखाने खंगत चालली होती. नानांचे तिकडे लक्षच नव्हते. त्यांचा रोजचा भांडणाचा क्रम सुरूच होता.

नानांच्या शेजारीच गंगाकाकू नावाच्या एक पोक्त बाई राहात असत. त्यांच्या हे सगळे लक्षात आले. या भांडणांचा निकाल लागल्याखेरीज आपल्या शेजारणीची प्रकृती सुधारणार नाही हे गंगाकाकूंना पक्के समजून चुकले. एके दिवशी दुपारी त्या नानांकडे गेल्या. नाना घरात नव्हते. गंगाकाकूंनी नानांच्या पत्नीला सगळी हकिकत आपुलकीच्या भावाने विचारून घेतली आणि त्यांच्या कानात गुरुमंत्र सांगून त्या निघून गेल्या.

आजपर्यंत नवस-सायासांसारखे पुष्कळ उपाय नानांच्या पत्नीने केले होते. तिचा गंगाकाकूंवर दृढ विश्वास होता. आता गंगाकाकूंनी सांगितलेला शेवटचा उपाय मन घट्ट करून, करून पाहाण्याचे तिने ठरविले.


दुसऱ्या दिवशी नानांनी भांडण उकरून काढून 'मी आता घराबाहेर निघून जातो' वगैरे म्हणताच, 'तुम्हांला इतका कंटाळा आला आहे तर तुम्ही घराबाहेर जाच' असे त्यांच्या पत्नीने म्हटले.

पत्नीचे बोलणे ऐकून नाना जरा चमकले, पण आदळआपट करीत खरोखरच ते घराबाहेर पडले आणि गावाबाहेर नदीकाठी जाऊन बसले.

नाना खरोखरच गेलेले पाहून त्यांची पत्नी घाबरली, पण गंगा-काकूंनी तिला धीर देऊन तिची समजूत घातली.

इकडे चिंतूनानांचा राग कमी होताच आपण घर उगीच सोडले असे त्यांस वाटू लागले. पण त्यांना आशा होती, की आपली पत्नी आपणास सन्मानाने परत बोलावील.

दुपार झाली तरी नानांकडे कोणीच आले नाही. नानांना अधिकच वाईट वाटू लागले, पण इलाज काय ?



संध्याकाळपर्यंत तरी आपली पत्नी येईल अशी नानांना आशा असल्याने ते नदीकाठी झाडाखाली उपाशीच बसून राहिले. संध्याकाळी सहा वाजले तरी कोणी येण्याचे चिन्ह दिसेना. नाना अगदी बेचैन झाले. इतक्यात त्यांच्या घरच्या म्हशी नदीवर आल्या होत्या, त्यांपैकी एकाची शेपटी धरून ते तिच्या पाठोपाठ चालू लागले. म्हैस अंगणात येताच नाना म्हशीला म्हणतात, 'अग अग म्हशी, मला कुठे नेशी?'

नानांच्या पत्नीच्या लक्षात सगळे आले. तिने काहीएक न बोलता नानांना आंघोळीला पाणी दिले नि ती मोठ्या आनंदाने जेवणाच्या कामाला लागली. त्या दिवसापासून नानांनी भांडण कायमचे सोडले.

१. चिंतूनानांची बायको का कंटाळली होती?
२. भांडणाच्या शेवटी चिंतूनाना काय म्हणत?
३. गंगाकाकूंनी कोणती युक्ती सांगितली?
४. चिंतूनानांच्या गोष्टीवरून कोणती म्हण पडली?

## १०

# लबाड साधू

एक होता साधू. तो कोणाजवळ बोलत नसे. कोणी काही त्याला आणून दिले, की तो 'नारायण, नारायण!' असे म्हणे.

हा कोणाजवळ बोलत नाही; 'नारायण, नारायण!' याशिवाय काहीच शब्द तोंडाबाहेर काढीत नाही; तेव्हा हा कोणी तरी थोर साधू असला पाहिजे असे लोकांना वाटे व लोक त्याला आदराने नमस्कार करून त्याच्यापुढे काही द्रव्य अगर खाद्य पदार्थ ठेवीत.

या बुवाला पुष्कळ मिळकत होते हे पाहून त्याच्या भोवती बरेच शिष्य गोळा झाले होते.

हे शिष्य लोकांना सांगत, 'हे पाहा, आमचे महाराज कोणाजवळ बोलत नाहीत आणि काही खातही नाहीत. नेहमी देवाचे ध्यान करण्यात गुंग असतात.'

साधूमहाराजांची कीर्ती आसपास पसरल्यामुळे लांबलांबच्या गावाहून बुवांच्या दर्शनाला लोक येत.

बुवांच्या पुढ्यात पैसे तर जमतच, पण पेढे, बर्फी, बदाम, खारका असल्या खाण्याच्या पदार्थांचे नुसते ढीगच्या ढीग पडत.

गावातील काही लोकांना बुवांबद्दल संशय होता. त्यांना वाटे, काही न खाता बुवांचा चेहरा इतका टवटवीत कसा राहातो? यात काहीतरी लबाडी असावी.

रात्री बुवा आपल्या खोलीत बसत तेथे कोणासही जाण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे हा संशय अधिकच वाढला.

खरे काय आहे हे पाहाण्यासाठी या लोकांनी एक युक्ती केली.

एके दिवशी सकाळीच ते बुवांच्या दर्शनासाठी म्हणून गेले. बुवा नुकतेच स्नान वगैरे आटोपून ध्यानस्थ बसले होते.



या लोकांनी बुवांना नमस्कार केला व बुवांना वासासाठी सुंदर मोठे असे गुलाबाचे फूल दिले. या फुलावर त्यांनी वास घेणारास ओकारी येईल असे काही द्रव्य आरंभीच शिंपडून ठेविले होते. बुवांनी वास घेऊन जरा तोंड वेडेवाकडे करीत 'नारायण, नारायण' म्हटले. इतक्यात बुवांना भडभडून आले. ते बसल्या जागीच खूप ओकले. त्यात पेढे, बर्फी, बदाम, पिस्ते पाहून लोकांना साधूमहाराजांची लबाडी कळली.

दुसऱ्या दिवशी बुवा कोठे नाहीसे झाले !

१. ह्या साधूबद्दल लोकांना काय वाटे ? त्यामुळे लोक काय करीत ?

२. काही लोकांना बुवांबद्दल का शंका आली ? त्यांनी काय केले ?

३. बुवा नाहीसे का झाले ?

## ११ शिकविलेली घोडी

एका गृहस्थाने एक घोडी बाळगिली होती. ती फार चलाख असल्यामुळे त्याला फार आवडत असे. कोठे जरासे जावयाचे असले तरी तो घोडीवर बसून जायचा. तिला त्याने निरनिराळ्या तऱ्हेच्या गोष्टी करण्यास शिकविले होते. कित्येक गोष्टी ती घोडी नुसत्या खुणेने इतक्या जलद रीतीने करावयाची, की जणू काय तिला सर्व गोष्टी समजल्याच आहेत. तिची ती चलाखी पाहून जो तो तिची वाखाणणी करावयाचा. घोडीची स्तुती ऐकून तिच्या मालकाला फार समाधान होई व तो तिच्यासंबंधी आणखी काही तरी सांगे.

या घोडीला जशा धन्याने केलेल्या खुणा समजत, तसे कांही शब्दही त्याने तिला समजावून दिले होते. 'हो' म्हणताच ती झटकन थांबावयाची व 'चलो' म्हणताच जोराने चौखूर धावायची.

एके दिवशी त्या गृहस्थाला शेजारच्या गावी काही जरूरीच्या कामासाठी जावयाचे होते, म्हणून तो आपल्या आवडत्या घोडीवर बसून सकाळीच निघाला. काही अंतर चालून गेल्यावर रस्त्याच्या बाजूला असलेली काही जांभळीची झाडे त्याला दिसली. ती झाडे पिकलेल्या जांभळांनी अगदी भरून गेली होती. ती पाहाताच त्या गृहस्थाला जांभळे खाण्याची इच्छा झाली. जांभळे खाण्याचा विचार मनात येताच त्याने घोडीला एका जांभळाच्या झाडाखाली नेले व 'हो' म्हटले. लागलीच घोडी थांबली.

घोडी थांबताच तिच्या रुंद पाठीवर उभा राहून तो गृहस्थ खुशाल जांभळे तोडून खाऊ लागला. घोडी इतकी शांत उभी राहिली होती, की आपण जमिनीवरच उभे आहोत असे त्या गृहस्थाला वाटले. तो मनाशी विचार करू लागला, आपली घोडी किती चांगली आहे!



सांगितलेली गोष्ट ती जशीच्या तशी करते. 'हो' म्हणताच थांबते व 'चलो' म्हणताच......इतक्यात त्याच्या तोंडून 'चलो' हा शब्द चुकून बाहेर पडला. घोडी भरधाव सुटली. वर उभा असलेला गृहस्थ झाडाच्या फांदीला लोंबकळत राहिला आणि मग तिकडून दुसरे वाटसरू जाईपर्यंत त्याला तसेच लोंबकळत राहावे लागले. मनात आलेली गोष्ट नकळत बाहेर पडली, पण तिचा किती वाईट परिणाम झाला बरे?

१. लोक घोडीची वाखाणणी का करीत?
२. जांभळाच्या झाडाजवळ आल्यावर काय झाले?
३. जांभळे काढीत असता घोडीच्या मालकाच्या मनात कोणते विचार आले?
४. त्याला शेवटी लोंबकळत का राहावे लागले?

## १२
# चतुर खुशमस्कऱ्या

पूर्वी राजे लोक व मोठमोठे सरदार आपल्या पदरी करमणूक व्हावी म्हणून खुशमस्कऱ्ये बाळगीत. खुशमस्कऱ्याची कामगिरी म्हणजे आपल्या धन्यांचे मनरंजन करणे एवढीच असे. हे लोक नेहमी राजाबरोबर असायचे. यांपैकी कित्येक मोठे हजरजबाबी व विनोदी असल्याने राजांचा व सरदारांचा त्यांच्यावर लोभ असे.

त्याच काळातली एक गोष्ट. एका मोठ्या राजाच्या पदरी भद्रसेन म्हणून एक चतुर खुशमस्कऱ्या होता. नाना तऱ्हेच्या संकटांतून त्याने आजपर्यंत राजाची सुटका केली असल्यामुळे राजाची त्याच्यावर फारच मर्जी बसली होती.

राजा स्वतः मोठा उदार असून विद्वानांचा चहाता होता. कोणी याचक अगर विद्वान त्याच्याकडून संभावना झाल्याखेरीज जायचा नाही. त्यामुळे नेहमी देशोदेशीचे विद्वान व याचक राजाकडे यायचे. अशा लोकांची संभावना करण्यास राजा कधीच कंटाळत नसे.

एकदा या राजाकडे एक फकीर काही मागावे म्हणून आला. राजाच्या भेटीस रिकाम्या हाताने जाऊ नये असे असल्याने त्याने राजाकडे जाताना थोडा सब्जा आपल्याबरोबर घेतला होता. राजेसाहेबांस भेटताच त्याने त्यांच्यापुढे तो सुवासिक सब्जा ठेविला आणि आपणास काही मिळावे अशी आपली इच्छा प्रकट केली. सब्जाचा तो सुरेख वास पाहून राजा अगदी खूष झाला व त्याने या फकिराला मोठे बक्षीस देण्याचा हुकूम केला.

त्याच दिवशी राजाकडे याचना करण्यासाठी एक गोसावी आला होता. फकिरानंतर त्याने राजाकडे जाऊन त्याला आशीर्वाद दिला व प्रसाद म्हणून थोडी राख राजाच्या हातावर ठेविली. आपल्या



हातावर याने राख ठेविली ही गोष्ट राजाला मुळीच आवडली नाही. त्याला या गोसाव्याचा फारच राग आला. रागाच्या भरात त्याच्या विनंतीकडे लक्ष न देता राजाने 'या गोसावड्याला आधी वाड्याच्या बाहेर धक्के देऊन घालवा' असा सेवकांना हुकूम केला.

सेवक बिचारे हुकमाचे ताबेदार! ते काय करणार? त्यांनी त्या गोसाव्याला बाहेर घालविण्यास सुरुवात केली. इतक्यात तेथे भद्रसेनाची स्वारी आली. एका गोसाव्याला राजाचे सेवक धक्के मारून घालवीत आहेत हे त्याला मुळीच आवडले नाही. त्याने सेवकांना थांबवून काय झाले म्हणून विचारले. सगळी हकिकत ऐकून घेतल्यावर त्या गोसाव्याची भद्रसेनाला दया आली. सेवकांना तेथेच थांबण्यास सांगून तो आत राजाकडे गेला व त्याने राजाला सगळी हकिकत विचारली.

भद्रसेनाचे बोलणे ऐकून राजा म्हणाला, 'भद्रसेना, आताच एक फकीर आला होता त्याने मला सबजा दिला, त्याचा वास किती गोड आहे पाहा आणि या भिकारड्या गोसावड्याने मात्र मला राख दिली. या राखेचा उपयोग काय? याचा अर्थ माझी राखरांगोळी होणार असा नाही का होत? ते काही नाही, मी केले ते अगदी योग्य असेच आहे.'

राजाचे बोलणे संपल्यावर भद्रसेन म्हणाला, 'महाराज! मला जे काही वाटते, ते सांगतो. पटले तर पाहा.'

'आपल्याला फकिराने सबजा दिला, याचा अर्थ सब-जा असा नाही का होत? आणि या गोसाव्याने आपल्या हातावर राख ठेविली म्हणजे तू जे असेल ते नीट राख असेच नव्हे का?'

हे भद्रसेनाचे बोलणे राजाला फारच आवडले. त्याने ताबडतोब त्या गोसाव्याची मुक्तता करवून त्यालाही मोठे बक्षीस देऊन त्याचा गौरव केला.

१. भद्रसेनावर राजाची मर्जी का बसली?
२. गोसाव्याने राख दिल्यावर काय झाले?
३. भद्रसेनाने शेवटी गोसाव्याची कशी सुटका केली?

## १३ चांगल्या मार्गाला लागला

फार फार जुन्या काळची गोष्ट. चीन देशात एक व्यापारी राहात असे. एकदा त्याचा वाढदिवस होता. देशोदेशीचे व्यापारी तेथे जमले होते. सगळ्यांनी नजराणे आणले होते. त्या दिवशी या चिनी व्यापाऱ्याकडे मोठी मेजवानी झाली.

संध्याकाळी सर्व समारंभ आटोपल्यावर ज्या खोलीत नजराणा म्हणून आलेल्या वस्तू ठेविल्या होत्या, त्या खोलीत तो व्यापारी सहज गेला. तो त्याला कपाटाच्या आड लपून राहिलेला एक मनुष्य दिसला.

त्याला आपण जणू पाहिलेच नाही असे दाखवून तो चिनी व्यापारी आपल्या नोकरास म्हणाला, 'अरे, सगळ्या पाहुण्यांची अजून व्यवस्था झालेली दिसत नाही. जा. स्वयंपाकघरातून पक्वान्नांनी भरून एक ताट घेऊन ये.'

नोकराने ताट आणताच ते टेबलावर ठेवून तो पुढे झाला व त्या लपून बसलेल्या माणसास म्हणाला, 'यावे महाराज, संकोच मुळीच करू नका. आपली सोय मला वेळीच करता आली नाही याबद्दल फार वाईट वाटते. या. फराळ करा.'

हे त्या चिनी व्यापाऱ्याचे बोलणे ऐकून तो गृहस्थ घाबरत घाबरत पुढे आला. काहीएक न बोलता त्याने फराळ केला.

फराळ आटोपताच त्या चिनी व्यापाऱ्याने त्या गृहस्थाला चांगले कपडे वगैरे दिले व त्याला निरोप देण्यासाठी तो बागेच्या फाटकापर्यंत गेला.

हे आपल्या धन्याचे कृत्य पाहून नोकरांना मोठे आश्चर्य वाटले, पण कोणी काही बोलला नाही.

या गोष्टीनंतर काही वर्षांची गोष्ट. असाच त्या चिनी व्यापाऱ्याचा वाढदिवस होता.

संध्याकाळी सर्व समारंभ आटोपून तो व्यापारी झोपण्याच्या विचारात होता, इतक्यात त्याच्याकडे कोणी पाहुणा आला असल्याचे त्याच्या नोकराने त्याला कळविले.

पाहुण्याला आत बोलाविले. पाहुणा आत येताच त्याने त्या चिनी व्यापाऱ्याचे पाय धरले. सगळ्यांना मोठे नवल वाटले.

आश्चर्याचा भर ओसरल्यावर त्या व्यापाऱ्यापुढे एक रत्नजडित आंगठी नजराणा म्हणून पुढे करीत तो माणूस म्हणाला, 'महाराज, आपण मला ओळखले काय? काही वर्षांपूर्वी आपणाकडे असाच वाढदिवस होता. मी चोरी करण्याच्या उद्देशाने आपल्या याच खोलीत लपून बसलो होतो, पण आपण अत्यंत उदारपणाने माझा जो सन्मान केला त्यायोगे मला पश्चात्ताप होऊन मी आपले वर्तन पूर्णपणे बदलले. त्या दिवसापासून मी काहीतरी धंदा करू लागलो. आता माझी स्थिती चांगली आहे. आपल्या उपकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी आपणास हा लहानसा नजराणा देत आहे त्याचा स्वीकार करावा.'

हे त्याचे बोलणे ऐकून सगळ्यांना तो जुना प्रसंग आठवला.

पुढे त्या चिनी व्यापाऱ्याने आपल्या पाहुण्याची योग्य संभावना करून त्याला निरोप दिला!

१. खोलीत कोणी तरी लपला आहे हे पाहून व्यापाऱ्याने काय केले?
२. व्यापाऱ्याच्या वागणुकीचा परिणाम काय झाला?
३. व्यापाऱ्याचे उपकार फेडण्यासाठी त्या माणसाने काय केले?

१४

## सांगकाम्या

रघू कळकळे फार साधा आणि प्रामाणिक माणूस होता. एखादी गोष्ट आपण करावयाचे कबूल केले, की हुकुमाबरहुकूम काम केलेच पाहिजे अशी रघूची दृढ समजूत असल्यामुळे, धन्याचा कोणताही हुकूम तो अगदी कसोशीने पाळीत असे. धन्याने दिलेल्या हुकुमात तिळमात्र बदल करावयाचा नाही हा तर रघूचा बाणा होता.

रघूच्या धन्याची रघूच्या प्रामाणिकपणाबद्दल पक्की खात्री होती. त्याच्यात एकच दोष होता. तो फक्त सांगितले गेले असेल तेवढेच करायचा, आजूबाजूला काही पाहायचा नाही.

कधी काही काम सांगितले आणि ते रघूने केले नाही असे मात्र कधीही झाले नाही. रघूच्या या स्वामिनिष्ठेबद्दल व प्रामाणिकपणाबद्दल त्याच्या धन्याला मोठे कौतुक वाटायचे. त्याच्या सांगकामेपणामुळे जरी धन्याला त्याचा राग आला, तरी तो टिकत मात्र नसे.

एकदा त्याच्या धन्याने त्याला बोलावून म्हटले, 'रघोबा, उद्या सकाळी शेजारच्या सोनगावी जाऊन यायचे आहे.' धन्याची आज्ञा मान्य करून रघूने 'जी, धनीसाब' म्हणून म्हटले व तो आपल्या रोजच्या कामाला लागला. सकाळी जाताना रघू आपणास विचारील तेव्हा काय काम ते त्याला सांगू असे धन्याने ठरविले.

रोजच्याप्रमाणे रघू पहाटे चार वाजता उठला. त्याने झटपट सकाळची आपली कामगिरी आटपली व तो जामानिमा करून उजाडण्यापूर्वीच शेजारच्या गावची वाट चालू लागला.

सकाळी सहा वाजता मंडळी उठली. चहापाणी वगैरे झाल्यावर घरधन्याने रघोबाला हाक मारली, पण रघोबा जाग्यावर कोठे होता ? तो कोठे गेला हे कोणाला माहीत नसल्याने त्याच्याबद्दल कोणासच

काही सांगता येईना. तो असा आजपर्यंत कधी सांगितल्याशिवाय बाहेर गेलेला नव्हता, पण न जाणो, तसेच काही काम निघाल्यामुळे कदाचित तो आपल्या घरी गेला असेल म्हणून चौकशीसाठी तिकडे माणूस पाठविला, पण रघूचा पत्ता लागेना. इतके होईतो दहा वाजले. रघूचे झाले तरी काय, याचा जो तो विचार करीत होता. इतक्यात दुरून मोठ्या घाईघाईने रघूची स्वारी येत असलेली दिसली. रघू येताना पाहून सगळ्यांना बरे वाटले.

तो जवळ येताच 'तू इतका वेळ कोठे होतास?' म्हणून धन्याने विचारले. त्यावर रघू आश्चर्याने धन्यास म्हणतो, 'धनीसाहेब, आपणच मला काल शेजारच्या सोनगावी जाऊन येण्यास सांगितले नाही का? ते आपण इतक्या लवकर कसे विसरलात? तुमच्या सांगीप्रमाणे मी सोनगावास जाऊन आलो.' यावर जरा चिडून धन्याने म्हटले, 'अरे, पण तू सोनगावला कशासाठी जायचे ते मला विचारलेस का?'

रघू म्हणाला, 'धनीसाहेब, तसे तुम्ही मला विचारावयास कोठे सांगितले होते?'

हे उत्तर ऐकून सगळ्यांनाच हसू आले, एवढे सांगितले म्हणजे मित्रांनो, तुम्हांला कळेल ना रघोबाची गंमत?

१. रघूचा स्वभाव कसा होता?
२. रघू सकाळी दिसला नाही तेव्हा काय झाले?
३. रघू परत आल्यावर काय झाले?
४. रघूला सांगकाम्या असे का म्हटले आहे?

१५

## लंबकर्ण

सांगूनसवरून गाढवच ते. त्याच्या प्रत्येक कृतीत सगळ्या जगाला गाढवपणा भरलेला दिसला तर त्यात काही मोठेसे नवल नाही.

जगातल्या सगळ्या लोकांनी त्याच्यावर असा शिक्का उगाच नाही मारला. गाढधाच्या गाढवपणाचा आणि लांब कानांचा मोठा इतिहास आहे.

फार फार जुनी गोष्ट. त्या वेळी सगळी माणसे आणि जनावरे आपसांत न भांडता जगात गुण्यागोविंदाने राहात होती. खावे, प्यावे, खेळावे आणि सगळ्यांनी मोठ्या आनंदाने एकत्र राहून दिवस काढावे, असा सगळ्या जनावरांचा क्रम चालावयाचा.

कधी कोणी मूर्खपणा किंवा फाजिलपणा केलाच तर तो गाढवच करीत असे. सगळी जनावरे सुखासमाधानात राहातात हे गाढवाला आवडत नसे. मधूनमधून सगळ्यांची आपसांत भांडणे व्हावी म्हणून ते खोट्यानाट्या चहाड्या सांगून एकमेकात वितुष्ट यावे असे करी व कोणी भांडू लागल्यास बाजूला उभे राहून गंमत पाही. पण इतर सगळ्या प्राण्यांची अगदी गट्टी असल्यामुळे आणि आपसांतील एकीमुळे गाढवाच्या उपद्व्यापाचा काही उपयोग होईना. गाढव काही तरी भांडणे लावण्याचा प्रयत्न करते, ही गोष्ट सगळ्यांनाच माहीत असल्यामुळे पुढे पुढे गाढवावर कोणाचा विश्वास बसेनासा झाला. आपल्यावर कोणाचा विश्वास बसत नाही आणि कोणाचेच आपसात भांडण होत नाही व आपणास मजा पाहावयास मिळत नाही, यामुळे त्याला चैन पडेनासे झाले. काही तरी युक्ती काढून या सगळ्या प्राण्यांची आपसात भांडणे लावावी म्हणून त्याने आता एक नवीनच युक्ती योजिली.

एके दिवशी त्याने सगळ्या लहानसान प्राण्यांना गोळा केले व मोठ्या गंभीर आवाजात सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले,

'मित्र हो, तुम्हांला कदाचित खोटे वाटेल; कारण मी सांगतो ते सगळे खोटे आणि लबाडीचे असते अशी तुमची सगळ्या मोठमोठ्या प्राण्यांनी समजूत करून दिली आहे. पण ही वेळ अशी काही चमत्कारिक आहे, की तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण आपणा सर्वांवर येणारा भयंकर प्रसंग काही चुकत नाही खास! तेव्हा सर्वांच्या हिताच्या दृष्टीने आगामी संकटाची सर्वांना माहिती द्यावी व काही उपाय सुचला तर पाहावा म्हणून मी आज तुम्हा सर्वांना येथे बोलाविले आहे. ही बातमी सगळ्यांनाच कळावी अशी माझी इच्छा होती; पण मोठ्या प्राण्यांचा माझ्यावर विश्वास नसल्याने तुम्हांला सांगून तुमच्यामार्फत संकटाची त्यांस माहिती होईल, म्हणून मी आज आपणा सर्वांना येथे येण्याची तसदी दिली.'

गाढवाने केलेली ही लांबलचक प्रस्तावना ऐकूनच सगळे प्राणी भयभीत होऊन गेले व पुढे कोणते मोठे संकट येणार हे ऐकण्यासाठी ते अगदी उत्सुक झाले.

त्यांचा आपल्यावर विश्वास बसलासे पाहून गाढव म्हणते, 'लवकरच सगळ्या जगावर मोठी आपत्ती येणार आहे. नक्की काय होईल हे काही मला सांगता येणार नाही, पण जिकडेतिकडे अंदाधुंदी माजून सगळ्यांचाच त्यात नाश होईल. कित्येकांना नाना तऱ्हेचे हाल सोसावे लागतील. पाहा. वेळीच मोठ्या देवाकडे जाऊन याला उपाय विचारल्याशिवाय यातून सुटका होईलसे दिसत नाही.'

गाढवाचे हे म्हणणे सगळ्यांना पटले. लागलीच ज्याने त्याने आपल्यापरी या बातमीचा प्रसार करण्यास सुरुवात केली. होता होता सगळ्यांना ही बातमी कळून सगळ्या प्राण्यांनी एक मोठी सभा भरविली व सर्वांनीच मोठ्या देवाकडे जाण्याचे ठरविले.



ठरल्याप्रमाणे सगळेजण एके दिवशी मोठ्या देवाकडे निघाले. हे पाहून गाढवाला मोठी मौज वाटली. सगळ्यांच्या अगदी मागे, आता पुढे काय होते ते पाहाण्यासाठी ते चालले होते.

देवाकडे गेल्यावर अगदी लवून सगळ्यांनी देवाला नमस्कार केला व सगळेजण स्तब्ध राहिले. तेव्हा 'का आलात?' म्हणून देवाने विचारले त्यावर सिंहाने पुढे होऊन एकंदर हकिकत देवाच्या कानावर घातली. ती ऐकून हसून देव म्हणाला, 'हे तुम्हांला सांगितले कोणी?'

तेव्हा जो तो दुसऱ्यावर हवाला सोपवू लागला.

सगळ्यांच्या मागे दूर गाढव मौज पाहात उभे होते. बातमी कोणी सांगितली हे कोणासच सांगता येईना.

शेवटी एका सशाने पुढे होऊन गाढवाचे नाव देवाला सांगितले. देवाने गाढवाला आपल्या समोर बोलाविले आणि त्याचे कान इतक्या जोराने ओढले, की ते मोठमोठ्याने ओरडून दुगाण्या झाडू लागले. सगळ्या प्राण्यांची पाचावर धारण बसली. ते सैरावैरा पळू लागले.

तेव्हापासून गाढवाचे कान लांब झाले. मागाहून आपल्या कृत्याचा गाढवाला पश्चात्ताप झाला, पण उपयोग काय?

'बैल गेला नि झोपा केला' त्यातलीच गत. आता ते नेहमी दुःखात चूर असून खाली मान घालून निमूटपणे मोठमोठी ओझी वाहात असते. ससा तर गाढवाच्या धास्तीने कावराबावराच झाला आहे.

१. गाढवाला कोणती गोष्ट आवडत नसे?

२. सगळ्यांची आपसात भांडणे व्हावीत म्हणून गाढव काय करी?

३. सगळ्या लहान प्राण्यांना जमवून गाढवाने काय सांगितले?

४. देवाने गाढवाची कशी खोड मोडली? त्यामुळे काय झाले?

१६

## प्रधानाचे चातुर्य

एका शहरात एक श्रीमंत व्यापारी राहात असे. त्याच्याजवळ पुष्कळच संपत्ती होती. या व्यापाऱ्याला तीन मुलगे होते. हे नेहमी आपसांत भांडत असत. आपल्या पश्चात हे असेच भांडत राहिले, तर सगळी संपत्ती ते भांडणांतच घालवितील असे त्या व्यापाऱ्याला वाटत होते, म्हणून त्याने आपल्या मृत्यूनंतर आपली संपत्ती कशी वाटली जावी हे आगाऊच ठरवून ठेविले होते.

पुढे त्या व्यापाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याचे तिघे मुलगे फार दिवस एकत्र राहिले नाहीत. थोडक्याच दिवसांत बापाच्या इच्छेप्रमाणे सगळी संपत्ती त्यांनी वाटून घेतली.

शेवटी फक्त सतरा हत्तींची वाटणीच काय ती शिल्लक राहिली. ही वाटणी कशी करावी याबद्दल मतभेद उत्पन्न होऊन मुलांची आपसांत भांडणे सुरू झाली.

या सतरा हत्तींपैकी निम्मा हिस्सा धाकट्या मुलाचा, तिसरा हिस्सा मधल्याचा व नववा हिस्सा थोरल्याचा होता. पण हे वाटे बरोबर करता येत नव्हते. कोणीही आपला हिस्सा सोडावयास किंवा त्यात काही कमीजास्त करण्यास तयार नव्हता.

होता होता हे भांडण राजापर्यंत गेले. पण राजालाही ते मिटविता येईना. मग ही कामगिरी राजाने प्रधानावर सोपविली.

प्रधान मोठा चतुर होता. त्याने मुलांस बोलावून म्हटले, 'तुमच्या हिश्शापेक्षा काही जास्त तुमच्या वाटणीस आले तर चालेल काय?' यावर खूष होऊन सर्वांनी 'होय' असे म्हटले.

मग प्रधानाने त्या सतरा हत्तींत आपला एक हत्ती आणून उभा केला व धाकट्या मुलाला म्हटले, 'हां चल, तुझा निम्मा हिस्सा घे.'



तेव्हा धाकट्या मुलाने नऊ हत्ती घेतले. नंतर मधल्याच्या हिश्शाचे सहा नि थोरल्याच्या हिश्शाचे दोन हत्ती त्या मुलांच्या स्वाधीन करून तो मुलांस म्हणाला, 'आता वाटणी बरोबर झाली ना?' मुलांनी आनंदाने 'होय' म्हणताच प्रधानाने राहिलेला आपला एक हत्ती परत नेण्यास नोकरास सांगितले.

हे प्रधानाचे चातुर्य पाहून राजा फार खूष झाला. त्याने प्रधानाला मोठे बक्षीस दिले.

१. हत्तींची वाटणी बरोबर का करता येईना?
२. योग्य वाटणी करण्यासाठी प्रधानाने काय केले?
३. प्रधानाचे चातुर्य पाहून राजाने काय केले?

१७

## हे असे का ?

फार फार जुन्या काळची म्हणजे सांगता येत नाही इतक्या जुन्या काळची गोष्ट सांगणार आहे आज मी तुम्हाला.

ब्रह्मदेवाने हे जग नुकतेच उत्पन्न केले होते. जगातल्या सगळ्या प्राण्यांची नीट व्यवस्था लावण्याचे काम संपल्यानंतर त्यांच्या सोयी गैरसोयी लक्षात घेऊन सगळ्यांच्या तक्रारी अगर अडचणी दूर करता याव्या म्हणून सगळ्या प्राण्यांच्या प्रतिनिधींचे एक मंडळ त्याने स्वर्गात स्थापन केले. त्या वेळी वाटेल त्याला स्वर्गात जाता येत असे.

या स्थापन केलेल्या मंडळाच्या स्वर्गात वारंवार सभा भरत व तेथे जे ते प्राणी आपल्या सोयी गैरसोयी सभेपुढे मांडून जरूर त्या सुधारणा सुचवीत असत.

सुचविलेल्या सुधारणा ब्रह्मदेव ताबडतोब अमलात आणी.

पण या सुधारणा अमलात आणल्या तरी सगळ्यांच्या तक्रारी कायमच असत.

एकदा माशांनी आपणास जमिनीवर राहाता येईल असे करावे म्हणून सुचविले, पण त्यामुळे त्यांची बेसुमार हानी होऊ लागली. ते पुन्हा मूळ स्थितीत आम्हांस आणा म्हणून खटपटी करू लागले.

माणसांच्या वतीने एकदा असे सुचविण्यात आले, की आम्हांस खाण्याचा वगैरे फार त्रास होतो, तेव्हा जे पदार्थ खावयाचे ते पोटात ठेवता येतील अशी योजना व्हावी.

झाले, पोटाला एक दरवाजा करण्यात आला. या दरवाजाला एक कुलूप लावण्याचीही सोय झाली. भूक लागली, की दरवाजा उघडावा नि खाण्याचे पदार्थ आत ठेवून द्यावे.



एके दिवशी राघोपंत रोडे झोपेच्या भरात पोटाचे कुलूप लावण्यास विसरले. तेव्हा घरातल्या बोकोबांचे चांगलेच फावले.

सकाळी राघोपंतांना सगळे कळून आल्यावर ते या योजनेच्या विरुद्ध तक्रार घेऊन निघाले. त्याच्या आधी दोन दिवस दिनोबा ढोल्यांच्या पोटाच्या कुलुपाची किल्ली हरवल्यामुळे त्यांना उपास काढावे लागले होते. ते राघोपंतांना येऊन मिळाले. होता होता त्यांना पाठिंबा देणारे पुष्कळच लोक जमले.

आपल्या तक्रारी ब्रह्मदेवाकडे मांडून रोडे नि ढोले यांनी या योजनेत बदल न झाल्यास आपण सत्याग्रह करू अशी धमकीही देण्यास कमी केले नाही.

या तक्रारींचा देवाला अगदी कंटाळा आला होता.

शेवटचा उपाय म्हणून देवाने सर्व प्राण्यांची सभा बोलाविली.

सभेला पुष्कळच प्राणी हजर होते. तक्रारी नाहीशा करण्यासाठी कोणती योजना करावी याबद्दल चर्चा सुरू झाली. पण कोणत्याच बाबतीत मतैक्य होईना.

प्रकरण आता हातघाईवर येणार असा रंग दिसू लागला, नि झाले पण तसेच !

ही आपसांतली लाथाळी पाहून ब्रह्मदेव खूप रागावला. त्याने आपल्या दूताकरवी सगळ्या प्राण्यांना घालवून लाविले व स्वर्गाचे दरवाजे बंद केले.

तेव्हापासून प्राणी देव देईल त्या स्थितीत नाइलाजाने राहात आहेत.

१. जग उत्पन्न केल्यावर प्राण्यांच्या तक्रारी नाहीशा करण्यासाठी काय केले ?
२. माशांनी व माणसांनी कोणत्या गोष्टी मागितल्या ?
३. तक्रारी नाहीशा व्हाव्यात म्हणून शेवटचा उपाय कोणता केला ?
४. ब्रह्मदेवाला का राग आला ? त्याने शेवटी काय केले ?

१८

# देव बोलेनासा झाला

सगळ्या प्राण्यांना घालवून दिल्यावर काही दिवसांनी रागाचा भर ओसरल्यावर ब्रह्मदेवाला सगळ्यांची आठवण झाली.

तो सगळ्यांवर जरी रागावला होता तरी त्याचे प्राण्यांवर फार प्रेम होते. जगात प्राण्यांचे कसे काय चालले आहे पाहावे म्हणून वेष पालटून पृथ्वीवर मुलाखतीसाठी यावे असे त्याने ठरविले. प्राण्यांपैकी इतर सगळे सांगूनसवरून निर्बुद्धच आहेत, त्यांच्या मुलाखती घेऊन उगाच वेळ घालविण्यात काही अर्थ नाही म्हणून अकलेचे कांदे जी माणसे त्यांच्या प्रतिनिधींच्याच फक्त मुलाखती घ्यावयाच्या असे ठरवून ब्रह्मदेव निघाले.

त्यांचा पहिला मुक्काम शंभू शिंप्याकडे पडला. शंभूच्या सुख-दुःखांबद्दल देवांनी शंभूबरोबर खूप चर्चा केली. शंभू असलेल्या परिस्थितीला अगदी कंटाळलेला दिसला. तो म्हणे, ‘सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करावे तेव्हा कुठे पोटापुरते जेमतेम मिळते. तेच आमच्या धोंडभट धडपड्यांचे पाहा. थोडीशी मेहनत केली, की सुग्रास भोजन नि वर दाक्षिणा ! चैन आहे त्यांची !’

पुढची मुलाखत धोंडभटजींची झाली. त्यांना असल्या स्थितीत मुळीच समाधान वाटत नव्हते. ते म्हणाले, ‘ही भिक्षांदेही अगदीच वाईट आहे. आमच्या शेजारच्या जमीनदार जयरामराव जेध्यांचे पाहा. किती सुखी आहेत ते !’

जयरामराव जेधे तरी सुखी असतील म्हणून देवाने आपला मोर्चा त्यांच्याकडे वळविला; तो काय ! ते तर आपल्या स्थितीला अगदी कंटाळलेले होते ! मुलाखतीच्या वेळी ते म्हणाले, ‘या कुळांच्या कटकटी ऐकून मी अगदी कंटाळून गेलो आहे. यापेक्षा देवाने मला राजा केले असते तर काय मजा झाली असती !’


IRBK-0116646

येथे कोणीच आपल्या स्थितीत समाधान मानीत नाहीसे पाहून ब्रह्मदेवाला जरा रागच आला, पण निदान राजा तरी नक्की सुखी असेल, तेव्हा त्याला भेटून पाहावे म्हणून तो राजाकडे गेला. पण तेथेही त्याची निराशा झाली. शेवटी रागावून तो येथून निघून गेला.

देव बोलेनासा झाला तो तेव्हापासूनच.

देवाला बोलता करावा म्हणून सगळ्यांचे पुष्कळ प्रयत्न चालले आहेत, पण अद्याप कोणाला त्या प्रयत्नांत यश आल्याचे ऐकिवात नाही.

१. प्राण्यांची स्थिती पाहाण्यासाठी देवाने काय केले ?

२. कोणाकोणाच्या मुलाखती घेतल्या ?

३. कोणीच सुखी नाहीसे पाहून देवाने काय केले ?